# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०१७ / फाल्गुन २३, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) आदिवासी विकास मंत्री**<br>**(२) उद्योग व खनिकर्म मंत्री**<br>**(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**<br>**(४) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**<br>**(५) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४५**

---

**देहरे आश्रमशाळा (ता.जव्हार, जि.पालघर) मैदानाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१) * २८०९७ श्री.जयंत पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या देहरे आश्रमशाळेतील मुलांना खेळण्यासाठी सुसज्ज मैदान मिळावे या उद्देशाने मैदानाच्या सपाटीकरणाच्या सादर केलेल्या प्रस्तावास जिल्हा क्रिडा अधिकारी, ठाणे यांनी दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास रुपये ७ लाख ५० हजार इतका निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मैदानाच्या सपाटीकरणाचे काम नाशिक येथील परिवर्तन स्वयंरोजगार संस्थेला देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देहरे आश्रमशाळेच्या मैदानाचे सपाटीकरण न करताच संबंधितांनी परिवर्तन स्वयंरोजगार संस्था मर्या., नाशिक या संस्थेशी संगनमत करून रुपये ५ लाख २५ हजाराचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा, देहरे यांचेस्तरावरून आश्रमशाळेकरिता मैदानाचे सपाटीकरण करणे या कामाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरिता जिल्हा क्रिडा अधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास त्यांनी दिनांक २/९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करून सदर कामाचा निधी मुख्याध्यापक यांचे खातेवर परस्पर वितरीत केला आहे. मैदानाचे सपाटीकरणाचे काम पूर्ण झालेले नसतानाही मुख्याध्यापकाने संबंधित ठेकेदाराला निधी वर्ग केला आहे. त्यानुषंगाने प्रकल्प अधिकारी, जव्हार यांनी दिनांक ६/१/२०१७ रोजी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून मुख्याध्यापकाचा खुलासा घेवून त्यांची सविस्तर चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सुतगिरणांना अर्थसहाय्य देणे तसेच बंद सुतगिरण्या पुनर्जिवित करण्याबाबत

**(२) * २७४४१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुतगिरण्यांच्या मान्यतेसाठी सुधारित धोरण आखणे व आर्थिक अडचणीत असलेल्या सुतगिरण्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्णय घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव, यवतमाळ, औरंगाबाद, जालना, परभणी, बुलढाणा, नांदेड, अमरावती व बीड या कापूस उत्पादन करणा-या जिल्हयातील सुतगिरणांना अर्थसहाय्य देण्याबाबत तसेच राज्यातील बंद असलेल्या सुतगिरण्या पुनर्जिवित करुन सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि दिनांक २७/१२/२०१६ रोजी मा.मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील सूतगिरण्यांच्या नोंदणीसाठी सुधारित धोरण ठरविण्याच्या अनुषंगाने मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अवसायनातील व बंद पडलेल्या सहकारी सूतगिरण्यांबाबत काय धोरण आखले पाहिजे यासाठी संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे स्तरावर विहित पध्दतीने सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत दिनांक १८/२/२०१७ रोजी कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खुलताबाद (जि.औरंगाबाद) येथील संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत**

**(३) * २९१६८ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुलताबाद (जि.औरंगाबाद) येथील तहसिल कार्यालयात संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील पाचशे लाभार्थ्यांची प्रकरणे मंजूरी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाभार्थींना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) नगर परिषद व जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणूक आचारसंहितेमुळे खुलताबाद तालुक्यातील विशेष सहाय्य कार्यक्रमाच्या योजनामधील ५२८ प्रकरणांवर निर्णय घेता आला नाही. दिनांक ०२/०३/२०१७ रोजी संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची बैठक घेऊन, त्यांमध्ये १९५ अर्ज मंजुर करण्यात आले असून, उर्वरीत ३३३ अर्ज त्रुटीमुळे नामंजूर करण्यात आले आहेत.

-----------------

## सामाजिक न्याय विभागाच्या उच्च माध्यमिक आश्रमशाळांचे बंद केलेले अनुदान सुरु करण्याबाबत

**(४) * २७५४५ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाकडून दिनांक २६ जून, २००८ च्या निर्णयातील अटी व शर्तीनुसार निकष निश्चित करण्यांत येऊन सन २००८-२००९ मध्ये परवानगी मिळून १२५ उच्च माध्यमिक आश्रमशाळांचे वर्ग सुरु करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता व कोणतीही वित्तीय तरतुद केलेली नसतांना क्षेत्रियस्तरावरील कार्यालयाने दिनांक २६ जून, २००८ च्या शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून सदर आश्रमशाळांना २५ ते ७५ टक्के अनुदान वाटप केल्याचे निदर्शनास आल्याने सदर आश्रमशाळांचे अनुदान बंद करण्यांत आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावासंदर्भात उच्चाधिकार समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या माहितीसह व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, फेरविचार करुन वेतन अनुदान बंद करण्यात आलेल्या सदर आश्रमशाळांचे अनुदान सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

तसेच तद्नंतर शासन निर्णय दिनांक ३१/८/२००९ नुसार २३ उच्च माध्यमिक आश्रमशाळांना शासनाने मंजूरी दिली. अशाप्रकारे एकूण १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या होत्या

(२) होय

(३) नाही.

(४) मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथील सुनावणीतील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील मान्यताप्राप्त कर्मचा-यांना वेतन अदा करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी गॅस अॅण्ड पॉवर प्रा.लि. प्रकल्पाचे विभाजन करुन**
**दोन स्वतंत्र कंपन्या स्थापन करण्याबाबत**

**(५) * २७३५० श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी गॅस अॅण्ड पॉवर प्रा.लि. (आरजीपीपीएल) प्रकल्पाचे विभाजन करुन रत्नागिरी पॉवर कंपनी आणि रत्नागिरी लिक्विफाईड नॅचरल गॅस (एलएनजी) कंपनी अशा दोन स्वतंत्र कंपन्या अस्तित्वात आणण्याबाबतचा निर्णय दिनांक १८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे, उक्त दोन स्वतंत्र कंपन्या प्रत्यक्षात केव्हापासून कार्यान्वित करण्यात येणार आहेत व त्यासाठी किती खर्च येणार आहे,

(३) असल्यास, उक्त कंपन्यामार्फत वीज व गॅस यांचे कशाप्रकारे व किती प्रमाणात उत्पादन होणार आहे, त्याचा पुरवठा कोणाला करण्यात येणार आहे तसेच राज्याला त्याचा किती व कशाप्रकारे लाभ होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) रत्नागिरी गॅस अॅण्ड पॉवर प्रा.लि. या कंपनीचे विभाजन करुन रत्नागिरी गॅस अॅण्ड पॉवर प्रा.लि. (वीज निर्मिती कंपनी) व कोकण एलएनजी प्रा.लि. कंपनी (एलएनजी टर्मिनल) या दोन कंपन्यांमध्ये रुपांतर करण्याबाबतचा निर्णय दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

(२) राष्ट्रीय कंपनी न्याय प्राधिकरण (National Company Law Tribunal) नवी दिल्ली यांच्याकडे कंपनी विभाजनाचा प्रस्ताव आरजीपीपीएलने मान्यतेकरिता सादर केला आहे. सदर प्रस्ताव मान्य झाल्यानंतर दोन्ही कंपन्या स्वतंत्रपणे कार्यान्वित होणार आहेत. विभाजनासाठी कोणताही खर्च येणार नाही.

(३) रत्नागिरी गॅस अॅण्ड पॉवर प्रा. लि. (आरजीपीपीएल) प्रकल्पातून निर्माण होणारी ५०० मे. वॅट वीज भारतीय रेल्वेला पुरवठा करण्यात येत असून तो वीज पुरवठा पुढेही सुरु राहील.

एलएनजी टर्मिनलमधून प्रती वर्षी अंदाजे ७६८,००,००० MMBTU इतका गॅस उपलब्ध होणार आहे. सदर गॅस मे.गेल कंपनी त्यांच्या ग्राहकांना विकणार आहे.

सदर गॅस विक्रीमधून राज्य शासनास प्रतिवर्षी अंदाजे सीएसटीद्वारे रु.८४ कोटी/ व्हॅटद्वारे रुपये २०९ कोटी इतका महसूल अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील लाखो नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थाचे मानीव अभिहस्तांतरण प्रलंबित असल्याबाबत**

**(६) * २६७८७ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या उदासिन धोरणामुळे राज्यातील लाखो नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थाचे मानीव अभिहस्तांतरण प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा संस्थांना महानगरपालिका कराची आकारणी दुप्पट दराने आकारत असून त्यांचा विकास करायचा झाल्यास अभिहस्तांतरणाचा हक्क नसल्यामुळे अशा सहकारी सोसायट्यांना बिल्डरच्या मर्जीशिवाय विकास करता येत नसल्याने सदर गृहनिर्माण संस्था अडचणीत आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे डिसेंबर, २०१६ पर्यंत नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांची संख्या किती आहे, त्यापैकी किती संस्थानी मानीव अभिहस्तांतरणाकरिता अर्ज दाखल केले आहेत तसेच किती गृहनिर्माण संस्थाना मानीव अभिहस्तांतरण देण्यात आले आहे,

(४) असल्यास, यासंदर्भात मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया पार पाडण्याकरीता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यात एकूण १,००,५२० इतक्या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून, त्यापैकी ११,०७६ सहकारी गृहनिर्माण संस्थानी मानीव अभिहस्तांतरणाकरिता अर्ज सादर केले आहेत. त्यापैकी १०,७४४ अर्जावर निर्णय घेण्यात आले असून, ५९२६ इतक्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र देण्यात आले आहे. ४३७ प्रकरणे नामंजूर झाली आहेत व ४३५१ अर्ज त्रुटी असल्याने परत केली आहेत. तसेच ३३२ अर्जावर कार्यवाही चालू आहे.

(४) सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मानीव अभिहस्तांतरणाबाबत प्रत्यक्षात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करण्यासाठी सहकार आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली विविध खात्यातील अधिकाऱ्यांची समिती नियुक्त केली होती. सदर समितीने अहवाल शासनास सादर केला असून त्या अहवालाच्या अनुषंगाने गृहनिर्माण विभागामार्फत सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## अंध-अपंग कर्मशाळा विद्यालयातील कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(७) * २९५६० श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ९८१८ ला दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंध-अपंग कर्मशाळा व विद्यालयातील सन २००५ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत अमरावती विभाग शिक्षक आघाडीने प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ पुर्वीच्या अंध-अपंग कर्मशाळा कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याविषयी शासनाचे धोरण काय आहे,

(३) असल्यास, सदर योजना केव्हा लागू करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) अनुदान प्राप्त शासनमान्य अपंगांच्या विशेष शाळा व संलग्नित वसतिगृहांमध्ये पूर्णवेळ काम करणा-या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १/२/१९८४ च्या शासन निर्णयान्वये सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक ११/७/२०१६ च्या शासन निर्णयान्वये शासनमान्य अनुदानित अपंगांच्या कर्मशाळेतील दिनांक १/११/२००५ पूर्वी नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना जुनी सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करण्यात आली आहे.

(३) शासन मान्यताप्राप्त अनुदानित अंध अपंग कर्मशाळेतील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या कर्मचा-यांना जूनी पेन्शन योजना दिनांक ११ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १०/८/१९९० पासून लागू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सिध्दार्थ व इतर वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(८) * २८९०० श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सिध्दार्थ व अन्य दोन वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सोई-सुविधा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहातील वॉटर फिल्टर मागील १ वर्षापासून बंद असल्याने क्षारयुक्त पाणी पिऊन २२ विद्यार्थ्यांना किडनी स्टोनचा आजार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सोई-सुविधा उपलब्ध करुन यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) विद्यार्थ्यांना सोई व सुविधा वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**तलासरी (जि.पालघर) येथील वरखंडा शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्याचा सर्पदंशांने मृत्यू झाल्याबाबत**

**(९) * २८९१२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) येथील वरखंडा शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता दुसरीमध्ये शिकणाऱ्या अरविंद पऱ्हेड या आदिवासी विद्यार्थ्याचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) शासकिय आश्रमशाळा वरखंडा, ता. डहाणू, जि. पालघर येथील इयत्ता २ री तील विद्यार्थी कु. अरविंद दिलीप प-हेड या निवासी विद्यार्थ्याची दिनांक २/१/२०१७ रोजी प्रकृती अचानक खालावल्यामुळे त्यास ग्रामीण रुग्णालय, तलासरी, जि. पालघर येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले असता उपचारादरम्यान दिनांक २/१/२०१७ रोजी संध्याकाळी त्याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. त्याचा शव विच्छेदन अहवाल अप्राप्त असल्याने त्याच्या मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शव विच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूच्या कारणानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**सालेगाव (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील शेतकऱ्याने आत्महत्या केल्याबाबत**

**(१०) * २९६८५ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेगाव (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील रामभाऊ मातोळे या शेतकऱ्याने सावकाराचे कर्ज फेडूनही त्याची सहा एकर जमीन सावकाराने हडप केल्याप्रकरणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सावकारावर कोणतीही कारवाई न केल्यामुळे सदर शेतकऱ्याने दिनांक २९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सावकारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) नाही.

कै. रामभाऊ रावण मातोळे यांचा सावकारांसंबंधात कोणताही तक्रार अर्ज शासनास प्राप्त झालेला नाही.

(३) दिनांक ३०/०१/२०१७ रोजीच्या दैनिक लोकसत्ता मधील बातमीस अनुसरून त्याच दिवशी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद यांनी केलेल्या चौकशीमध्ये कै. रामभाऊ रावण मातोळे यांची वारसदार पत्नी व २ मुले यांचे जबाब घेतले आहेत. सदर जबाबाच्या अनुषंगाने व सदर व्यवहारामध्ये सावकारीचा व्यवहार झाला आहे काय याची चौकशी करण्यासाठी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, लोहारा यांना सुचना दिलेल्या आहेत त्यानुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर, औरंगाबाद, पुणे व कोकण येथे महावितरण कंपनीच्या प्रादेशिक कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत**

**(११) * २९८६१ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या वीज महावितरण कंपनीने ग्राहकांच्या तक्रारी व अडचणीचे निराकरण कार्यालयाच्या ठिकाणी होण्यासाठी नागपूर, औरंगाबाद, पुणे व कोकण येथे नवीन प्रादेशिक तक्रार निवारण कार्यालये सुरु केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रादेशिक कार्यालयांना आवश्यक असलेला अधिकारी व कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात आला नसल्याने वीज ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेतली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तक्रार निवारण प्रादेशिक कार्यालयांना आवश्यक असलेला अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थी सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहिल्याबाबत**

**(१२) * २९८१२ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३९९६ ला दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक व अन्य किरकोळ खर्चासाठी सन २०१०-११ मध्ये सुरु करण्यात आलेल्या सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेपासून ठाणे जिल्ह्यातील २५ हजाराहून अधिक विद्यार्थी वंचित असल्याचे दिनांक ९ सप्टेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यातील प्रलंबित राहिलेल्या १३०२४ प्रकरणांवरील कार्यवाही पुर्ण होऊन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

राज्यातील अनुसूचित जमातीच्या इयत्ता १ ली ते १० मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक तसेच इतर खर्च भागविण्यासाठी दिनांक ३१ मे, २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये "सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना" सुरू करण्यात आलेली आहे. सन २०१५-१६ पासून सदर योजना ई-स्कॉलरशिप ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे राबविण्यात येत असून सदर प्रणालीमध्ये काही तांत्रिक अडचणी आल्याने प्राप्त अर्जांची पडताळणी करण्यास काही प्रमाणात विलंब झाला आहे. सदर तांत्रिक अडचणी दूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) सदर योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यातील प्रलंबित १३०२४ अर्जापैकी १२५८६ अर्जांवर कार्यवाही करण्यात आलेली असून उर्वरित ४३८ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे प्रस्ताव संबंधित शाळांकडून अप्राप्त असल्याने प्रलंबित आहेत. याबाबत प्रकल्पस्तरावरून संबंधितांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आश्रमशाळांमध्ये होणारे मुलींचे लैंगिक शोषण व मृत्यूंबाबत कारवाई करण्याचे दिलेले आदेश

**(१३) * २९६९९ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रमशाळांमध्ये होणारे मुलींचे लैंगिक शोषण व मृत्यूंची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दखल घेत राज्याच्या मुख्य सचिवांना येत्या सहा आठवडयात त्यावर सविस्तर उत्तर सादर करण्याचा आदेश दिला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आयोगाने राज्यात मागील दहा वर्षात ७५० हून अधिक मुलींच्या आश्रमशाळांमध्ये झालेल्या मृत्यूची दखल घेत शासनाला दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ रोजी नोटीस बजावली होती, परंतू या नोटीसची कोणतीही दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) मा. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजीच्या पत्रान्वये मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना पाठविलेल्या पत्रास अनुसरून शासनाने दिनांक १५/२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना अहवाल सादर केला आहे.

(२) मा. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, नवी दिल्ली यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये पत्र पाठवून चार आठवड्याच्या आत अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुषंगाने मा. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग यांना शासनाच्या दिनांक २८/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये विहित मुदतीत अहवाल शासनास सादर केला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यात टेक्स्टाईल पार्क उभारण्याबाबत**

**(१४) * २८४७३ श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यात लांब धाग्याचा कापूस उपलब्ध असल्याने टेक्स्टाईल पार्क उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरीकांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत अतिरिक्त यवतमाळ (जि.यवतमाळ) या ठिकाणी मेगा टेक्सटाईल पार्कसाठी जमिनी राखून ठेवण्यात आली असून रस्ते, पाणी, वीज व इतर पायाभूत सुविधा पुरविण्यात येणार असून लवकरच विकास कामे पूर्ण करुन भूखंड वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार या ठिकाणी सी.ई.टी.पी ची सुविधा पुरविण्यात येणार आहे

-----------------

**टोमॅटो, नारळ, कांदा इ. शेतमाल शेतकऱ्यांकडुन व्यापारी कमी दराने खरेदी करीत असल्याबाबत**

**(१५) * २७५१३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टोमॅटो, नारळ, कांदा इ. शेतमाल शेतकऱ्यांकडून व्यापारी उत्पादन खर्चापेक्षा कमी दराने खरेदी करित असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना शेतमालाचा उत्पादन खर्च वगळता अधिक ५० टक्के नफा मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) टोमॅटो व कांदा यांचे यावर्षी उत्पादन झाल्यामुळे बाजारात होणाऱ्या जास्त आवकामुळे भाव कमी झालेले आहेत. तसेच जानेवारी २०१७ मध्ये बाजारात नारळाची आवक जास्त असल्याने नारळाचेही दर कमी झालेले आहे.

(२) राज्य शासनाकडून धान्य, कडधान्य व तेलबिया यांच्याकरिता, किमान आधारभूत किंमतीसाठी केंद्र शासनास शिफारस करताना १५% नफा अपेक्षित धरुन आधारभूत किंमतीची शिफारस केली जाते.

व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून माल घेताना आधारभूत किंमतीपेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करु नये व अशा घटना घडल्यास तात्काळ संबंधित व्यापाऱ्यांविरुध्द कार्यवाही करावी, अशा सूचना पणन संचालनालय स्तरावरुन देण्यात आल्या आहेत.

तसेच किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत कडधान्य व तेलबियांची खरेदी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भीमनगर-भावसिंगपुरा (जि.औरंगाबाद) येथील वसतिगृहात दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत**

**(१६) * २८०३१ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील भीमनगर-भावसिंगपुरामध्ये बहुजन हिताय वसतिगृहातील पिण्याच्या पाण्याच्या विहिरीनजीक भूमिगत ड्रेनेज लाईन व नाल्याचे काम केल्याने वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी अधिसूचित केलेले क्षेत्र वगळण्याच्या प्रक्रीयेमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१७) * २७९७२ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १९५३० ला दिनांक २९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदेदुमाला (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील माहे जानेवारी, २०१६ पर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी अधिसूचित २८५.८६ हे. आर क्षेत्रापैकी १५१.५७ हे. आर क्षेत्र अधिसूचित क्षेत्रातून वगळण्याच्या प्रक्रीयेमध्ये गैरव्यवहार झाला असल्याने सदर गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) इगतपूरी औद्योगिक क्षेत्रासाठी गोंदु दुमाला २५७.८६ हे.आर क्षेत्र मऔवि अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ च्या तरतुदी लागू करुन दिनांक ०९/०८/२००७ रोजी अधिसूचित करण्यात आले आहे. या अधिसूचित क्षेत्रामधील १५१.५७ हे.आर क्षेत्रात मे. अशोका इंडस्ट्रियल पार्क यांनी १२८.१२ हे.आर क्षेत्रावर कंपनीने केंद्र शासनाच्या औद्योगिक उद्यान योजनेंतर्गत जमीन प्राप्त केली होती. तसेच उर्वरीत क्षेत्रामध्ये इतर कंपनीने अकृषिक प्रयोजनार्थ जमिनी खरेदी करुन अकृषिक वापर सुरु केला होता. यामुळे महामंडळाच्या औद्योगिक वापराचा उद्देश खाजगीरीत्या साध्य होत असल्याने उपरोक्त १५१.५७ हे आर क्षेत्र विनाअधिसूचित करण्यात आले आहे. उर्वरीत क्षेत्राच्या संपादनास खातेदारांचा विरोध असल्यामुळे संयुक्त मोजणीचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. तसेच या क्षेत्रातील खातेदारांनी २ कोटी ते ३ कोटी २० लाख प्रती एकरी नुकसान भरपाईची मागणी केली आहे. सदरचा दर अवाजवी असल्यामुळे त्यामुळे १५१.५७ हे.आर व्यतिरिक्त उर्वरीत संपूर्ण क्षेत्र विनाअधिसूचित करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पीक कर्जाची रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१८) * २७७०८ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना सन २०१६-१७ च्या रब्बी हंगामासाठी आवश्यक असलेली एकूण पीक कर्जाच्या रक्कमेनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडून उपलब्ध होणारी रक्कम कमी असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रब्बी हंगामासाठी आवश्यक असलेली पीक कर्जासाठी लागणारा अर्थपुरवठा सुरळीत करण्याच्या दृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) विमुद्रीकरणानंतर चलनपुरवठ्याबाबतची कार्यवाही भारतीय रिझर्व बँकेमार्फत करण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक १३/०२/२०१७ अखेर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी रुपये ४४२८ कोटी रब्बी पीक कर्ज वाटप लक्षांकापैकी रुपये ११३७ कोटीचे वाटप २.२३ लाख शेतकऱ्यांना केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्याबाबत**

**(१९) * २९७६४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १९८२ पासून शेतमाल तारण योजना सुरु असून सदर योजनेंतर्गत गोदामात ठेवलेल्या शेतमालाच्या मूल्याच्या ७५ टक्के तारण कर्ज सहा टक्के व्याज दराने उपलब्ध करुन दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ शेतक-यांना मिळण्यासाठी शासन व पणन मंडळ यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय,

राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे माध्यमातून सन १९९० पासून सदरची शेतमाल तारण कर्ज योजना राबवत आहे.

(२) सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृषि पणन मंडळामार्फत बाजार समित्यांना वेळोवेळी पत्र व परिपत्रकाद्‌वारे कळविण्यात येते तसेच योजनेच्या प्रसिध्दीसाठी व शेतकऱ्यांना योजनेची माहिती होण्यासाठी पणन मंडळ व बाजार समित्यामार्फत स्थानिक वृत्तपत्रांत जाहिरात देऊन तसेच बॅनर, पॅमप्लेटस् इ. द्‌वारे योजनेस प्रसिध्दी देण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर येथे दिव्यांग प्रादेशिक केंद्र उभारण्याबाबत**

**(२०) * २८६४२ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे दिव्यांग प्रादेशिक केंद्र उभारण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केंद्राची उभारणी किती कालावधीत करण्यात येणार आहे, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) दिव्यांग व्यक्तिकरीता संयुक्त प्रादेशिक केंद्र ही केंद्र शासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभागाची योजना असून सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या अधिनस्थ "नॅशनल इन्स्टिटयूट फॉर एम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ मल्टीपल डिसॅबिलिटिज" चेन्नई या संस्थेंच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली संयुक्त प्रादेशिक केंद्र, नागपूर हे केंद्र इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे तात्पुरत्या स्वरुपात सुरु आहे. राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दिनांक ०४/०१/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर संयुक्त प्रादेशिक केंद्राच्या उभारणीकरीता मौजे जाटतरोडी ता. नागपूर (शहर) जि.नागपूर येथील २२३२० चौ.मी जमीन भाडेतत्वावर मंजूर करण्यात आली आहे. संयुक्त प्रादेशिक केंद्र उभारणीची कार्यवाही केंद्र शासनामार्फ़त करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात वीजेची खरेदी खाजगी वीज कंपन्यांकडून इलेक्ट्रिसिटी अॅक्टनुसार करण्यात येत असल्याबाबत**

**(२१) * २९१०८ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन खाजगी वीज कंपन्यांकडून वीजेची प्रत्यक्षात खरेदी न करता सन २००३ च्या इलेक्ट्रिसिटी अॅक्टनुसार करीत असल्यामुळे प्रतिवर्षी रुपये चार हजार कोटी अदा करीत असल्याने त्याचा बोजा वीज ग्राहकांवर पडत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त करारामुळे राज्य शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होऊन ग्राहकांवर त्याचा बोजा पडत असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) विद्युत अधिनियम, २००३ मधील अधिनियम ६३ नुसार वीज खरेदी ही पारदर्शक स्पर्धात्मक निविदेद्वारे करण्यात येते. महावितरण कंपनीने भविष्यातील संभाव्य वीज मागणीनुसार अधिनियमातील सदर तरतुदीनुसार वीज खरेदीचे दिर्घ मुदतीचे करार केले आहेत. तसेच प्रत्यक्षात या वीज खरेदी करारातील वीज निर्मिती उत्पादकांकडून वीज घेताना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मेरीट ऑर्डर डिस्पॅच मधील विनियमाच्या तरतुदीनुसार सर्वात कमी वीज दर असणाऱ्या उत्पादकाकडून प्रथम वीज घेण्यात येते. या तत्वानुसार जादा वीज दर असणाऱ्या वीज उत्पादकाकडून वीज खरेदी करार जरी केला असला, तरी प्रत्यक्षात वीज घेण्यात येत नाही. मात्र अशा उत्पादकांना स्थिर आकाराची रक्कम द्यावी लागते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवळी (जि.वर्धा) येथील ट्रान्सफार्मला लागलेली आग

**(२२) * २७०५६ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळी (जि.वर्धा) येथील पॉवरग्रीड कॉर्पोरेशन आफॅ इंडियाच्या ७६५ के.व्ही पारेषणच्या ट्रान्सफार्मला आग लागून ट्रान्सफार्मर जळाल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) केंद्र शासनाच्या अखत्यारितील पॉवरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीच्या देवळी उपकेंद्रातील ZTR Ukraine बनावटीच्या ७६५ के.व्ही. वर्धा-औरंगाबाद-४ बी फेज ११० एम.व्ही.ऐ.आर अवरोधकामध्ये (Reactor) दिनांक १२/०१/२०१७ रोजी आग लागली होती.

(२) सदर प्रकरणी अवरोधक निर्मात्या कंपनीशी संपर्क साधण्यात आला व त्या कंपनीच्या तज्ञ मंडळींनी दिनांक २३/०१/२०१७ रोजी घटनास्थळी भेट देऊन प्राथमिक तपासणी अहवाल पॉवर ग्रीड कंपनीस सादर केला आहे. अशा प्रकारची घटना भविष्यात घडू नये याकरिता सदर घटनेच्या मूळ कारणाच्या विश्लेषणासहित सविस्तर अहवाल अवरोधक निर्मात्या कंपनीकडून लवकरच अपेक्षित आहे. तसेच अशा प्रकारची घटना भविष्यात घडू नये यासाठी सखोल चौकशी करण्यासाठी त्रयस्थ सल्लागाराची नियुक्ती करण्याची कार्यवाही पॉवरग्रीड कंपनीने सुरु केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्हयात वीज महावितरण कंपनीतील**
**कर्मचाऱ्याने केलेली आत्महत्या**

**(२३) * २९८७१ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात वीज महावितरण कंपनीतील वरिष्ठांकडून होत असलेल्या जाचामुळे अभियंत्यावर मानसिक ताण वाढून हृदयविकाराचा झटका येणे, आत्महत्या करणे इत्यादी प्रकारात वाढ होत असल्याने अभियंत्यांच्या संघटनेने (सबॉर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन) प्रशासनाला राज्यव्यापी आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण मधील श्री.पानसरे या कर्मचाऱ्याच्या आत्महत्येस जबाबदार असणाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करणे तसेच संघटनेच्या इतर मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अभियंत्यांच्या संघटनेचे निवेदन मुख्य अभियंता, महावितरण, नाशिक यांना प्राप्त झाले आहे.

(२) श्री. पानसरे यांच्या मृत्यूबाबत चौकशी करण्यासाठी महावितरण कंपनीने नेमलेल्या त्रिसदस्यीय चौकशी समितीच्या अहवालानुसार दोषी आढळलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई सुरु आहे.

तसेच अभियंत्यांच्या संघटनेच्या इतर मागण्यांबाबत महावितरण कंपनीस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दौंड (जि.पुणे) येथील वसतिगृहातील मुलांच्या शिधापत्रिकेवर देण्यात येणारे धान्य बंद केल्याबाबत**

**(२४) * २७२७१ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मागासवर्गीय वसतिगृहातील मुलांच्या शिधापत्रिकेवर देण्यात येणारे धान्य माहे डिसेंबर, २०१६ पासून बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर वसतिगृहातील मुलांना थकीत महिन्यापासूनचे धान्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नंदूरबार जिल्हयात बनावट कागदपत्रांद्वारे उद्योजकांनी अनुदान घेतल्याबाबत**

**(२५) * २९५७८ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदूरबार जिल्हयात बनावट कागदपत्रांद्वारे २९ उद्योजकांनी रुपये ६ कोटी, ३ लाख, १४ हजार, ८६२ इतके अनुदान घेतले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) राकेश पितऱ्या नाईक व श्री.अमर तु.पाडवी यांनी केलेल्या तक्रारीवरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदूरबार यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीअंती सामुहिक प्रोत्साहन योजना-२००१ राबविताना लाभधारक घटकांनी या योजनेचा लाभ घेताना जिल्हा उद्योग केंद्र, नंदुरबार येथील तत्कालीन अधिकारी/कर्मचारी यांचेशी संगनमत करुन बेकायदेशीर व अप्रामाणिकपणे सादर केलेल्या प्रस्तावात बनावट कागदपत्रे सादर करुन, नियम, अटींचे व शर्तीचे पालन झालेले नसतांना नियम, अटीं व शर्तीचे पालन केले असल्याबाबत खोटी/बनावट प्रमाणपत्र सादर करुन ती अनुदान प्राप्त करण्यास वापरली आहेत असे आढळून आले आहे.

(२) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार यांनी केलेल्या चौकशीनुसार जिल्हा उद्योग केंद्र, नंदुरबार येथे कार्यरत असलेले तत्कालीन अधिकारी/कर्मचारी (१) श्री.स्वरुपसिंग पाया वसावे, महाव्यवस्थापक (सेवानिवृत्त) (२) दामु शंकर पाडवी, शाखाप्रमुख, वर्ग-३ (३) श्री.विजयकुमार म्हसुदेव निक्रड, लघुटंकलेखक (नि.श्रे.) वर्ग-३ (४) जगदिश रघुनाथ श्रीवास, उद्योग निरिक्षक, वर्ग-३ (५) ओंकार गुरुदयाल चव्हाण, उद्योग निरिक्षक, वर्ग-३ (सेवानिवृत्त) यांनी उद्योग घटकांचे मालकांशी संगनमत करुन शासनाविरुध्द कट रचून, शासनाने निर्गमित केलेल्या सामुहिक प्रोत्साहन योजना-२००१ मधील नमूद तरतुदींचे उल्लंघन करुन अनुदान मिळण्यासाठी जे प्रस्ताव सादर केले त्यात बनावट, खोटे कागदपत्रे खोटे असल्याचे माहिती असताना त्याकडे डोळेझाक करुन शासनाचे नुकसान केले म्हणून त्यांचेविरुध्द तसेच घटकांविरुध्द नंदुरबार शहर पोलीस स्टेशन गु.र.नं.१४/२०१७ , भा.द.वि. ४२०,४६५,४६८,४७१,४७४,१२० (ब), ३४ तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (क) १३ (१) (ड), सह १३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील कर्ज वसुली न करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याबाबत

**(२६) * २७९०३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील बिगरशेती कर्ज वसुली विभागातील वसुली पोटी सहकार न्यायालयाने अवार्ड नोटीस जारी करूनही विहित मुदतीत वसुली न करणे, पुढील प्रक्रिया न राबवणे तसेच बँकेच्या थकबाकीस कारणीभूत असणाऱ्या बेजबाबदार वसुली अधिकारी, विशेष वसुली अधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांची चौकशी करण्याची मागणी पाथरी येथील सामाजिक कार्यकत्यांनी प्रधान सचिव, सहकार यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे दिनांक ०३ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) बिगरशेती थकीत कर्जाची वसुली करण्याबाबत सन २०१६-१७ मध्ये विशेष कृती आराखडा तयार करावा, विशेष वसुली अधिकारी यांचेमार्फत अधिक कठोरपणे वसुलीची कार्यवाही करावी. ज्या प्रकरणामध्ये सहकार न्यायालयाने अवार्ड पारित केले आहे अशा प्रकरणामध्ये तातडीने जंगम/स्थावर मालमत्ता जप्त करून वसुलीची कार्यवाही करावी असे निर्देश विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांनी दिनांक ३१/८/२०१६ च्या पत्रान्वये परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस दिलेले आहेत. एकूण १०९ प्राप्त अवार्डपैकी ३३ प्रकरणांमध्ये मालमत्ता जप्त करण्यात आली आहे व जप्तीनंतर सदर १८ बिगरशेती सहकारी संस्थांची मालमत्ता विक्री करुन रुपये ३२४.३० लाख एवढी वसूली आणि १६ बिगरशेती संस्थांकडील थकीत रकमेची रुपये ७९.१० लाख वसूली तसेच १७ बिगरशेती सहकारी संस्थांची अंशत: रुपये ११.६३ लाख वसूली झालेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीत मेंम्बा केम या पेट्रोलियम कंपनीमध्ये लागलेली आग

**(२७) * २८१०४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीत मेंम्बा केम या पेट्रोलियम कंपनीत दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास आग लागल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जून, २०१६ पासून सदर औद्योगिक वसाहतीतील कंपनीत आग लागण्याची ही ५ वी घटना असून या औद्योगिक विभागीतील कंपन्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याने परिसरातील स्थानिक रहिवाशांमध्ये भितीचे व धोक्याचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने संबंधित कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या वसाहतीमध्ये असलेल्या कारखान्यामध्ये अशा घटना घडू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय. मे.मेम्बा केम प्लॉट नं १७/२६ या कंपनीत दिनांक १९/१२/२०१६ रोजी दुपारी १३.१० वा. आग लागली होती हे खरे आहे.

(२) जून, २०१६ पासून ३ कंपन्यांना आगी लागल्याच्या घटना घडल्या आहेत. तथापि तळोजा औद्योगिक विभागातील कारखान्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला नाही. तसेच परिसरातील स्थानिक रहिवाशांमध्ये भितीचे व धोक्याचे वातावरण निर्माण झालेले नाही.

(३) उपरोक्त कारखान्यांवर कारखाने अधिनियम १९४८ अंतर्गत प्रत्येकी एक फौजदारी खटला दाखल केला असून एका कारखान्यावर कारखाने अधिनियमाच्या भंग केल्याबाबत एक खटला दाखल करण्यात येत आहे.

(४) मऔवि महामंडळास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषित केले आहे. त्यानुसार कारखान्यांचे नकाशे मंजुर करताना महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावली व अग्निसुरक्षा अधिनियमात नमूद केल्याप्रमाणे अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना सुचवल्या जातात. बांधकाम पूर्ण झाल्यावर सदर उपाययोजनांची तपासणी करुन ती योग्य असल्याची खात्री करुन अतिंम ना-हरकत प्रमाणपत्र

देण्यात येते. सदर अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना सुस्थितीत ठेवणे सदर कारखान्यांची कायदेशीर जबाबदारी असून अग्निसुरक्षा अधिनियमाप्रमाणे नियुक्त केलेल्या लायसन्स एजन्सीमार्फत सदर अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजनांची तपासणी करुन घेऊन त्यांनी सादर केलेले प्रमाणपत्र दर वर्षाच्या जानेवारी व जुलै महिन्यात देणे बंधनकारक आहे. तसेच तळोजा औद्योगिक वसाहतीत महामंडळामार्फत सुसज्य असे अग्निशमन केंद्र प्रस्थापित करुन कार्यान्वित करण्यात आले आहे. सदर अग्निशमन केंद्राची सेवा तळोजा औद्योगिक वसाहतीतील उद्योगांना २४x७ (Round ‘O’ Clock) दिली जाते. त्याचप्रमाणे भविष्यात अशा घटना घडू नये म्हणून कामगारांच्या सुरक्षेचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात येत असून आपत्कालीन आराखडयाची प्रात्यक्षिके घेण्यात येतात. निरिक्षणाच्या वेळी आढळलेल्या सुरक्षाविषयक त्रुटींबाबत पूर्तता करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या मृत्यूसंदर्भात समिती गठीत केल्याबाबत

**(२८) * २७४७४ श्री.संजय दत्त, श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक २३५४५ ला दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये प्रतिवर्षी अंदाजे ८० पेक्षा अधिक असे मागील दहा वर्षांत एकूण ७४३ आदिवासी विद्यार्थांचे मृत्यू झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या मृत्यूचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ.सुभाष सांळूखे, सेवानिवृत्त आरोग्य महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने तांत्रिक समिती गठित करुन समितीने आपला अहवाल मा.राज्यपाल महोदयांना दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या आश्रमशाळांमध्ये पोषक आहार, शुद्ध पाणी, वैद्यकीय इत्यादी पायाभूत सुविधांचा अभाव यांसारख्या अनेक कारणांमुळे सदर मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासंदर्भातील डॉ.सुभाष साळुंखे यांच्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) यासंदर्भात मा.उच्च न्यायालयात सन २०१३ मध्ये जनहित याचिका दाखल झालेली आहे. त्यामध्ये दहा वर्षात शासकिय आश्रमशाळांमध्ये विविध कारणांनी ७९३ विद्यार्थ्यांचे मृत्यू झाल्याची माहिती शासनाने न्यायालयात शपथपत्राद्वारे दिनांक ४/६/२०१३ रोजी सादर केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) समितीने विद्यार्थी मृत्यूच्या विविध कारणांचा अभ्यास करुन त्यामध्ये सुधारणा होणेसाठी विविध उपाय योजना सुचविलेल्या आहेत.

(४) व (५) सदर शिफारशींवर विभागाकडून कार्यवाही सुरु आहे. सदर समितीने शिफारस केल्यानुसार आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या जेवणाची वेळ बदलण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या मृत्यूची २४ तासात चौकशी करणेसाठी समिती स्थापन केलेली आहे. तसेच विद्यार्थी मृत्यूचा सामाजिक वैद्यकिय दृष्टीने अभ्यास करुन त्याचा तिमाही आढावा जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर घेण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. आश्रमशाळेत ANM ची सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत आरोग्य विभागास कळविण्यात आले आहे. आरोग्य खात्यामार्फत शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी कार्यक्रम तसेच CSR अंतर्गत काही शाळांमध्ये मोबाईल हेल्थ युनिटद्वारे नियमित तपासणी करण्यात येत आहे. आश्रमशाळेमध्ये स्वच्छ पाणी पुरवठा व आरोग्याबाबत वॉश कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना वैयक्तिक आरोग्य व पोषणाबाबत जागृती होण्यासाठी जीवन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम पुढील शैक्षणिक वर्षापासून राबविण्याचे नियोजन केलेले आहे.

-----------------

**राज्यातील अनुदानित आश्रमशाळांना देण्यात येणाऱ्या परिरक्षण-भोजन अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(२९) * २७५४८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३५०८ ला दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित आश्रमशाळांना देण्यात येणाऱ्या परिरक्षण-भोजन अनुदानात वाढ करण्यासंबंधिच्या विचाराधीन बाबींवरील शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय दिनांक १ मार्च, २०१६ अन्वये मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली स्थापित अभ्यास गटाने महागाई निर्देशांकानुसार व प्रत्यक्ष खर्चावर आधारित परिरक्षण-भोजन अनुदानात वाढ करण्यासंबंधिची शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व सदरील निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासुन करण्यांत येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही

(२), (३) व (४) परिपोषण अनुदानात वाढ करण्याची बाब अद्याप विचाराधीन आहे.

-----------------

**राज्यातील साखर कारखान्यांच्या सहवीज प्रकल्पातून तयार वीज खरेदी करण्यासंदर्भात**

**(३०) * २७३५५ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखान्यांच्या सहवीज प्रकल्पातून तयार झालेली दोन हजार मेगावॅट वीज खरेदी करण्यासंदर्भात नेमण्यात आलेल्या भाटीया समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(२) असल्यास, अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, समितीचा अहवाल केव्हापर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) भाटीया समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## औरंगाबाद महावितरण परिमंडळाच्या महावितरण आपल्यादारी या योजनेतील वीज जोडण्या प्रलंबीत असल्याबाबत

**(३१) * २८९०९ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महावितरण परिमंडळाच्या महावितरण आपल्यादारी या योजनेतील औरंगाबाद ग्रामीण भागातील ८५०० नवीन वीज जोडण्या प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात पाण्याअभावी पिकांचे नुकसान होवू नये म्हणून १२ तास विद्युत पुरवठा करण्याबाबत शासनाचे महावितरणास आदेश असतांना विद्युत पुरवठा करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रलंबित जोडण्या व गाव पातळीवर शेतीसाठी १२ तास विद्युत पुरवठा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
औरंगाबाद ग्रामीण मंडळांतर्गत "महावितरण आपल्या दारी" या योजनेंतर्गत एकूण १२,८२५ कृषीपंपधारकांना केबलद्वारे वीज पुरवठा करण्यात आला आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

महावितरण कंपनीकडून कृषीपंप ग्राहकांना दिनांक ०८/०९/२०१६ ते १५/१२/२०१६ पर्यंत १२ तास वीज पुरवठा देण्यात येत होता. दिनांक १५/१२/२०१६ पासून कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा पूर्ववत ८ ते १० तास चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे. औरंगाबाद ग्रामीण मंडळांतर्गत जानेवारी, २०१७ अखेर ८८०१ कृषीपंप पैसे भरुन वीज जोडणी करिता प्रलंबित आहेत. २३६० कृषीपंपाना

जानेवारी, २०१७ अखेर मराठवाडा विशेष पॅकेज अंतर्गत निधीमधून वीज जोडण्या देण्यात आल्या असून डिसेंबर, २०१६ अखेरपर्यंत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपाना मार्च, २०१७ अखेर वीज जोडण्या देण्याचे उद्दिष्टे आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने फळे-भाजीपाला**
**नियमन मुक्तीचे उल्लंघन केल्याबाबत**

**(३२) * २७३०२ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिपंरी-चिंचवड मधील पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने उपबाजार आवाराबाहेर फळे खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना नियमन मुक्तीच्या विरोधात बाजार शुल्क व देखरेख खर्च भरण्याच्या नोटीसा दिल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) हे खरे आहे. पुणे बाजार समितीच्या पिंपरी चिंचवड उपबाजाराच्या चतु:सिमा दिनांक १८/५/२००१ च्या अधिसूचनेन्वये निश्चित करुन संपुर्ण पिंपरी गाव हे बाजार आवार म्हणून घोषित केले होते. त्यामुळे बाजार समितीने आवाराबाहेरील व्यापाऱ्यांना नोटीसेस दिल्या होत्या. तथापि, पणन अधिनियमातील सुधारणेनंतर बाजार समितीच्या चतु:सिमा क्षेत्रफळासह आरेखित करण्यासाठी दिनांक २०/१/२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये बाजार समितीची दिनांक १८/५/२००१ ची अधिसूचना रद्द केल्यामुळे बाजार समितीने आवाराबाहेरील व्यापाऱ्यांना दिलेल्या नोटीसेस दिनांक १३/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये रद्द केल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वीज महावितरणच्या बीड विभागाच्या थकबाकीत वाढ असल्याबाबत

**(३३) * २९४६२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड विभागातील महाराष्ट्र राज्य वीज महावितरणच्या वीज बीलाची रुपये ११०० कोटी थकबाकी असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरगुती, व्यापारी व औद्योगिक ग्राहकांकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात थकबाकी रहाण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन थकबाकी वसूलीबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) माहे डिसेंबर, २०१६ अखेर बीड विभागात महावितरणच्या वीज बिलाची रुपये ७४७ कोटी एवढी थकबाकी आहे.

(२) व (३) त्यापैकी घरगुती ग्राहकांकडे रुपये ८३.५५ कोटी, वाणिज्यिक ग्राहकांकडे रुपये ८.३५ कोटी व औद्योगिक ग्राहकांकडे रुपये ३.९१ कोटी इतकी थकबाकी आहे.

बीड विभागात एकूण ३६ वसुली पथके कार्यरत असून महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे थकबाकी वसुलीची कामे सुरु आहेत. सन २०१५-१६ मध्ये २५६१३ व सन २०१६-१७ मध्ये १५७५० वीज थकबाकीदार ग्राहकांना कायदेशीर नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. तसेच बीड विभागामध्ये दिनांक ०१ एप्रिल, २०१६ पासून आजपर्यंत एकूण ३००२ ग्राहकांचा वीज पुरवठा थकबाकीचा भरणा न केल्यामुळे कायमस्वरुपी खंडीत करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांमधील सोलर वाटर हिटर खरेदी व बायोमेट्रिक यंत्रणेच्या गैरव्यवहारांची चौकशी करणेबाबत**

**(३४) * २७९८२ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १९४९३ ला दिनांक २९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांमधील सोलर वॉटर हिटर खरेदी व बायोमेट्रिक यंत्रणा बसविणे या प्रकरणांमधील गैरव्यवहारांची चौकशी करण्यासाठी दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सचिव व विशेष चौकशी अधिकारी १, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी समितीने शासनास अहवाल सादर केलेला आहे काय, सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणाचा चौकशी अहवाल अद्याप शासनास सादर करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोकणातील दोडामार्ग व सावंतवाडी तालुक्यात एमआयडीसी प्रकल्पाची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) * २८१२५ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील दोडामार्ग व सावंतवाडी तालुक्यात रोजगाराच्यादृष्टीने महत्वाच्या आडाळी एमआयडीसी प्रकल्पासाठी जमिन संपादनाचे काम पूर्ण झाले असले तरी प्रकल्पाची अनेक कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त एमआयडीसी प्रकल्पाची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) आडाळी ता.दोडामार्ग औद्योगिक क्षेत्रासाठी जमीन संपादनाचे काम पूर्ण झालेले नसून २८८.५५ हे.आर इतके क्षेत्र अधिसूचित करण्यात आले असून त्यापैकी २६४.२४ हे.आर इतके महामंडळाच्या ताब्यात आले आहे. तथापि सावंतवाडी येथे ओदयोगिक क्षेत्र स्थापन करण्यात आलेले नाही.
(२) व (३) आडाळी औद्योगिक क्षेत्रासाठी पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रुपये ४८,९१,५६,७००/- (नक्त) व रुपये ५६,२५,३०,३००/- (ठोक) इतक्या रक्कमेसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून अंतिम आराखडा मंजूर झाल्यानंतर निविदा काढण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना वीज पुरवठा करण्याबाबत**

**(३६) * २९१०९ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतक-यांना दिवसा शेतीला पाणी देता यावे यासाठी १२ तास वीज पुरवठा करण्याचा निर्णय दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाने घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली काय, सदर निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीवर रुपये ६०० कोटीचा बोजा पडणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तूत प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर निर्णयाची अंमलबजावणी दिनांक ०८/०९/२०१६ ते १५/१२/२०१६ या कालावधीत करण्यात आली असून, महावितरणकडून प्राप्त माहितीनुसार ०८ सप्टेंबर, २०१६ ते १५ डिसेंबर, २०१६ पर्यंत कृषीपंपाना देण्यात आलेल्या अतिरिक्त वीज पुरवठयापोटी रुपये १२५४.३२ कोटीचा आर्थिक भार शासनावर पडणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---------------

**मारेगाव (जि.यवतमाळ) येथील चिधुजी पुरके आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा झाल्याबाबत**

**(३७) * २७०९९ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारेगाव (जि.यवतमाळ) येथील चिधुजी पुरके आश्रमशाळेतील ६० विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा झाल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे. मारेगांव (जि.यवतमाळ) येथील चिंधुजी पुरके आश्रमशाळेतील ५८ विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा झाल्याचे निदर्शनास आले. या विद्यार्थ्यांना ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले होते. त्यापैकी ४२ विद्यार्थ्यांना उपचारानंतर रुग्णालयातून सोडण्यात आले. १६ विद्यार्थ्यांना उपचारासाठी रुग्णालयात ठेवण्यात आले होते. त्यापैकी ११ विद्यार्थ्यांना दिनांक १३/१/२०१७ रोजी व ५ विद्यार्थ्यांना दिनांक १५/१/२०१७ रोजी रुग्णालयातून सोडण्यात आले आहे. आता सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती उत्तम आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली. दुषित पेयजलामुळे विषबाधा झाल्याचे दिसून आले आहे. या अनुषंगाने संबंधित दोषींवर कार्यवाही करण्याबाबत प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा यांनी शाळा व्यवस्थापकांना निर्देश देण्यात आले होते. तथापि संबंधित संस्थेने तत्पुर्वीच दिनांक ०७/०२/२०१७ पासून श्री.पी.बी.कुडमेथे, अधिक्षक व श्री.डी.ए. मानकर, मदतनीस यांना निलंबित केले आहे. तसेच श्री.पी.एस,चहाणकर, प्राथमिक मुख्याध्यापक, श्री.पी.व्ही. जाधव, प्रभारी माध्यमिक मुख्याध्यापक, श्री.जे.एम.जुनघरी, प्रयोगशाळा परिचर व श्रीमती एम.डी. पुसनाके, कामाठी यांची पुढील एक वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी RO फिल्टर व वॅाटर कुलर संस्थेने बसविले आहेत. तसेच विद्यार्थ्यांना सकस आहार देण्याच्या सुचना संस्थेला देण्यात आल्या आहेत

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गुढे-नावरे (ता.जि.जळगांव) गावास लोण सबस्टेशनकडून वीज पुरवठा करण्याबाबत

**(३८) * २९५८२ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुढे-नावरे (ता.जि.जळगांव) येथील क्षेत्रात बागायती शेती असून एक दिवसा आड वीज पुरवठा होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावासाठी कजगांव सबस्टेशन ऐवजी लोण सबस्टेशनकडून वीज पुरवठा करण्याची व दररोज ८ तास सलग वीज पुरवठा करण्याची मागणी येथील शेतक-यांनी संबंधित अधिका-यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महावितरण कंपनीकडून मौजे गुढे-नावरे या गावांच्या शेतीपंपाचा वीज पुरवठा दिनांक ४/२/२०१७ पासून ३३/११ के.व्ही. लोण उपकेंद्रातून निघणाऱ्या गोंडगाव गावठाण फिडरवर तात्पुरत्या स्वरुपात जोडण्यात आला असून, सदर फिडरवर मौजे नावरे गावानंतर बसविण्यात आलेल्या A.B.Switch द्वारे शेतीपंपाना दररोज ८ तास वीज पुरवठा केला जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेत नियमबाह्यरित्या गृह कर्ज वाटप करणाऱ्या संचालकांवर कारवाई करण्याबाबत**

**(३९) * २७७७५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील बीगरशेती विभागाची नकारार्थी टिपणी असतांनाही बिगर शेती तारण कर्ज, गृहकर्ज, वाहन कर्ज इत्यादी कर्ज वाटप व इतर गैरव्यवहारासंदर्भातील प्रकरणे संचालक मंडळाने सभेव्दारे मंजुर केल्याने बँकेचे आर्थिक नुकसान व गैरव्यवहाराची जबाबदारी निश्चित करण्याबाबत जिल्हा उपनिबंधक, परभणी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ७२ (३) नुसार विभागीय सहनिंबधक, औरंगाबाद यांचेकडे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अहवाल सादर करुन संचालक व अधिकारी यांना नोटीस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, काही प्रकरणांची वसुली होत नसल्यास कर्ज मंजुर करणारे संचालक हे वैयक्तिक व सामुहिकरित्या जबाबदार राहतील असेही त्या अहवालात नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नकारार्थी टिपणी असताना नियमबाह्यरित्या गृहकर्ज (बीगर शेती) वाटप करणाऱ्या संचालक व अधिकारी यांची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने वाटप केलेल्या गृहकर्ज प्रकरणाचा चौकशी अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी दिनांक ७/१०/२०१६ च्या पत्रान्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना सादर केलेला आहे.

(२) होय.

(३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशीचे आदेश दिनांक २३/०२/२०१७ रोजी निर्गमित केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाड (जि.रायगड) तालुक्यातील एमआयडीसीतील सांडपाणी नियमबाह्यरित्या नदीपात्रात सोडल्याबाबत**

**(४०) * २८१०५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील एमआयडीसीमधील केमिकल कारखान्यांतील सांडपाण्याचे सीईटीपीद्वारे शुध्दीकरण होऊन नंतर ते पाणी आंबेत खाडीमध्ये सोडण्याचे आदेश असतानाही तेथील कारखान्यांनी नियम डावलून खाडीपट्ट्यातील नदीपात्रात दुर्गंधीयुक्त काळे पाणी सोडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड एमआयडीसी कार्यक्षेत्रातील नवीन रासायनिक केमिकल कारखान्यांनी प्रदूषित सांडपाणी सोडण्याबाबत खबरदारी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कारखान्यातील रसायन मिश्रित सांडपाण्यामुळे शेती नापिक होऊन पाण्याचे स्त्रोत देखील दूषित झाल्याने स्थानिक नागरिकांना विविध रोगांची लागण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कारखान्यांवर व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे, खरे नाही.

(२) हे, खरे नाही.

(३) महाड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आंतररुग्ण व बाहय रुग्ण विभागाचे तपासणीमध्ये, तसेच आरोग्य कर्मचा-यांच्या गृहभेटीमध्ये कोणत्याही रोगाची लागण झालेले रुग्ण आढळून आलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राणी उंचेगांव (ता.घनसावंगी, जि.जालना) येथील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना वीज जोडण्या देण्याबाबत**

**(४१) * २९२५२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राणी उंचेगांव (ता.घनसावंगी, जि.जालना) येथील शेतकऱ्यांनी वीज वितरण कंपनीस आवश्यक कागदपत्रांची पूर्तता व नियमित फी भरुन देखील कृषी पंपांच्या वीज जोडणीची कामे प्रलंबित असल्याने अनेक समस्या निर्माण झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन रितसर कोटेशन घेऊनही कृषीपंपांना वीज जोडणी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे आहे.

घनसावंगी उप विभागांतर्गत राणी उंचेगांव गावामध्ये माहे जानेवारी, २०१७ अखेर पैसे भरुन वीज पुरवठयाकरिता प्रलंबित कृषीपंपांची संख्या २२ असून त्यांना वीज पुरवठा देण्याकरिता एकूण ४.१ कि.मी. इतक्या लघुदाब वाहिनीची गरज आहे. सदर वाहिनी उभारणीचे काम विदर्भ-मराठवाडा कृषीपंप वीज जोडणी योजनेंतर्गत महावितरण कंपनीकडून करण्यात येत असून कंत्राटदारास ई-निविदेद्वारे कार्यादेश देण्यात आला आहे. १५ कृषीपंपाना मार्च, २०१७ अखेर वीज जोडणी देण्यात येणार आहे. उर्वरित कृषीपंपाना निधी उपलब्धतेनुसार पायाभूत सुविधांची कामे पूर्ण झाल्यानंतर जेष्ठता यादीनुसार वीज जोडणी देण्यात येणार आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक येथे कृषी टर्मिनल मार्केट उभारण्याबाबत**

**(४२) * २७९८५ श्री.जयवंतराव जाधव, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४९४८ ला दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे कृषी टर्मिनल मार्केट उभारण्याच्या प्रस्तावास दिनांक २२ जुलै, २००९ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मान्यता मिळूनही टर्मिनल मार्केटचे काम सुरू झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टर्मिनल मार्केटसाठी जागा उपलब्ध होण्यासाठी दिनांक ७ जानेवारी, २०१२ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, नाशिक यांनी सहकार व पणन विभागाला प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, जिल्हा प्रशासनाने प्रस्तावित केलेली जागा महाराष्ट्र कृषी पणन मंडळास हस्तांतरीत करून या टर्मिनल मार्केटच्या उभारणीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) मौजे पिंपरी सय्यद, जिल्हा नाशिक येथील १०० एकर जमीन कृषी पणन मंडळास टर्मिनल मार्केटच्या उभारणीसाठी उपलब्ध करुन देण्यास ग्रामविकास विभाग, नगरविकास विभाग व महसूल विभाग यांनी सहमती दर्शविली आहे. तथापि सदर जागेवर मोठ्या प्रमाणावर उत्खनन झाले असून खड्डे पडल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर जागा टर्मिनल मार्केटच्या उभारणीसाठी योग्य आहे किंवा कसे याबाबत पणन संचालक यांना प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**बुलढाणा येथील शासकिय वसतिगृहातील**
**मुलींना सोयी-सुविधा मिळण्याबाबत**

**(४३) * २७२१६ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा येथील समाजकल्याण विभागांतर्गत हाजी मंलग बाबा दर्ग्याजवळील शासकिय वसतिगृहातील मुलींना सोयी-सुविधा मिळत नसल्याने विद्यार्थीनींनी सामाजिक न्याय भवनात ठिय्या आंदोलन केल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबंधितांवर काय कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) संबंधित गृहपालास मा.आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे आदेश पत्र क्र.१२ दिनांक ०३/०१/२०१७ नुसार सेवेतुन निलंबित केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील बंद साखर कारखाने सुरु करुन साखरेच्या**
**उत्पादनात वाढ करण्याबाबत**

**(४४) * २९६०५ श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक २३६३२ ला दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ३८ टक्के साखर कारखाने पुरेशा प्रमाणांवर ऊस न मिळाल्याने बंद झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात साखरेच्या उत्पादनात घट होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय. सन २०१६-१७ गाळप हंगामामध्ये १५० साखर कारखान्यांनी गाळप घेतलेले असून माहे जानेवारी, २०१७ अखेर ९० साखर कारखान्यांचे गाळप बंद झालेले आहे.

(२) होय. सन २०१६-१७ गाळप हंगामामध्ये ३९०.५० लाख मे.टन ऊसाचे गाळप होईल व सरासरी ११.२०% उताऱ्याने ४३.७४ लाख मे.टन साखरेचे उत्पादन होईल असा अंदाज आहे. सन २०१५-१६ च्या तुलनेत हंगाम २०१६-१७ मध्ये साखर उत्पादन ४०.४१ लाख टनाने कमी होण्याचा अंदाज आहे.

(३) सन २०१५-१६ च्या तुलनेत हंगाम २०१६-१७ मध्ये ऊस क्षेत्र ३.५४ लाख हेक्टरनी कमी झालेले असल्याने अपु-या ऊस उपलब्धतेमुळे साखर कारखान्यांनी गाळप हंगाम कमी दिवसात पुर्ण केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्हयातील शिष्यवृत्ती योजनेतील गैरप्रकारांबाबत

**(४५) * २७६२९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना तसेच इतर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेऊन त्याचे अभिलेखे दाखल न करणाऱ्या विविध शैक्षणिक संस्थांविरूध्द कारवाई करण्याचे आदेश सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, परभणी यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्ती संबंधिचे अभिलेखे विहित मुदतीत सादर न करणाऱ्या संस्था व संस्थाचालक यांच्याविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे,

(२) विशेष चौकशी पथकाने त्यांच्या अहवालात नोंद घेतली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.